दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.४ नोव्हेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ७४ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 3 Nov 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 74 • Pages 4 • Rate 4 Rs


### मंत्री छगन भुजबळ यांच्यावर यशस्वी हृदय शस्त्रक्रिया

**मुंबई**–राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्यावर आज एशियन हार्ट इन्स्टिटयूट मुंबई येथे हृदय शस्त्रक्रिया करण्यात आली. विख्यात हृदयरोग तज्ञ डॉ. रमाकांत पांडा यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्यावर ही शस्त्रक्रिया पार पडली असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.या शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांनी पुढील काही दिवस विश्रांती घेण्याचा सल्ला छगन भुजबळ यांना दिला आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार छगन भुजबळ यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होण्यासाठी त्यांना पुढील काही दिवस कोणालाही भेटता येणार नाही अशा सूचना डॉक्टरांनी दिल्या आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असून ते लवकरच पूर्णपणे बरे होऊन आपल्या कार्यात पुन्हा सक्रिय होणार आहेत.

# शिवसैनिकांचा अपमान सहन केला जाणार नाही शंभूराज देसाईंचा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना इशारा

## शिवसेनेला कमी लेखले तर शांत बसणार नाही–शंभूराज देसाई

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा शंखनाद होत असतानाच साताऱ्याचे पालकमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते शंभूराज देसाई यांनी महायुतीतील सहकाऱ्यांनाच थेट इशारा दिला आहे. शिवसैनिकांचा कुठेही अपमान होणार नाही, आणि जर झाला, तर जशास तसे उत्तर दिलं जाईल, अशा शब्दांत त्यांनी आपला ठाम पवित्रा मांडला. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिकांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेलं हे विधान राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरलं आहे. देसाई यांनी स्पष्ट केलं की, महायुती म्हणून आपले दोन इतर सहकारी पक्ष आपल्याबरोबर आहेत आणि त्यांचा सन्मान राखला जाईल. मात्र शिवसेनेला कुठेही कमी लेखलं जाईल, तर आम्ही शांत बसणार नाही.**



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**
निवडणुकांच्या अनुषंगाने राज्यात सर्वच पक्षांमध्ये उमेदवारीची चाचपणी, दौरे आणि रणनीती बैठकींना वेग आला आहे. न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पूर्वी निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यामुळे, स्थानिक पातळीवरील राजकीय हालचालींना आणखी गती मिळाली आहे. सातारा जिल्ह्यातही कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असून, विविध पक्षांत तिकिटांसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. अशा वेळी शंभूराज देसाईंचं हे विधान शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारं ठरतं आहे. शिवसेना ही महायुतीतील एक प्रमुख घटक आहे, त्यामुळे तिचा सन्मान राखला पाहिजे, असा सूर त्यांनी कायम ठेवला. त्यांच्या या वक्तव्यामुळे साताऱ्यातील तसेच संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांमध्ये हलचाल झाली आहे.महायुतीच्या अंतर्गत सध्या काही ठिकाणी समन्वयाचा अभाव आणि स्थानिक नेत्यांमधील मतभेद दिसून येत आहेत. देसाई यांनी याच मुद्द्यावर भाष्य करत म्हटलं की, आपल्या युतीत सन्मान राखला पाहिजे. पण कोणी कार्यकर्त्यांना कमी लेखण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याला उत्तर मिळेल. त्यांच्या या इशाऱ्यामुळे शिवसेना शिंदे गटाने निवडणुकांसाठी स्वतंत्रपणे लढण्याची शक्यता राजकीय चर्चेचा विषय बनली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नेहमीच स्थानिक पातळीवरील शक्तीप्रदर्शनाचं मैदान ठरत असल्याने, प्रत्येक पक्षासाठी या निवडणुका प्रतिष्ठेच्या बनल्या आहेत.

### अन्याय सहन करायचा नाही

शंभूराज देसाई यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी पुन्हा एकदा शिवसैनिकांना आवाहन केलं की, आपण शांततेच्या मार्गाने काम करत राहायचं, पण अन्याय सहन करायचा नाही. त्यांनी कार्यकर्त्यांना संघटित राहण्याचं आणि आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेचा झेंडा उंचावण्याचं आवाहन केलं. साताऱ्यापासून राज्यभरात त्यांच्या या भूमिकेचा परिणाम दिसून येण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा जसजशी जवळ येत आहे, तसतसे राजकीय आरोप–प्रत्यारोप आणि इशाऱ्यांचं सत्र तीव्र होण्याची चिन्हं स्पष्ट दिसत आहेत. महायुती टिकवून ठेवत असतानाही प्रत्येक पक्ष आपली सत्ता आणि ओळख मजबूत करण्याच्या प्रयत्नात असल्याचं या घटनाक्रमावरून स्पष्ट होतं.

### डॉक्टर आत्महत्या प्रकरणावरही भाष्य

दरम्यान, फलटण शहरातील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणावरही शंभूराज देसाई यांनी भाष्य केलं. या प्रकरणी देवेंद्र फडणवीस यांनी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने तपास सुरू केला आहे. या SIT च्या प्रमुख आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते या स्वतः फलटणमध्ये दाखल झाल्या असून, त्यांनी प्रकरणाची प्रत्यक्ष तपासणी सुरू केली आहे. या प्रकरणात दोषी कोणताही व्यक्ती असो, त्याला वाचवले जाणार नाही. प्रत्येक गोष्ट आणि प्रत्येक व्यक्तीची तपासणी पारदर्शक पद्धतीने होईल, असा ठाम शब्दांत खुलासा देसाई यांनी केला.

# संभाजी ब्रिगेड केज तालुकाध्यक्षपदी शिवश्री आकाश नखाते यांची निवड


दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**
संभाजी ब्रिगेडच्या संघटनात्मक बांधणी अंतर्गत केज तालुक्यातील पदाधिकारी निवड प्रक्रियेत शिवश्री आकाश नखाते यांची एकमताने केज तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर गजानन अंबाड जिल्हा संघटक,सचिन साखरे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख, तालुका उपाध्यक्ष, अभिजित पवार यांची निवड करण्यात आली नवीन तालुकाध्यक्ष शिवश्री आकाश नखाते यांनी संघटनेच्या माध्यमातून समाजातील तरुणांना संघटित करून छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांचा प्रसार व सामाजिक परिवर्तनाचे कार्य जोमाने राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.



संभाजी ब्रिगेडच्या जिल्हा पक्षाच्या वतीने त्यांच्या निवडीबद्दल हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.या निवड प्रक्रियेस प्रदेश संघटक अतुल भैय्या गायकवाड,विभागीय उपाध्यक्ष विलास गुंठाळ,जिल्हाध्यक्ष शिवश्री राहुल भैय्या खोडसे, मराठा सेवा संघ केज तालुका अध्यक्ष जयदीप देशमुख,उपाध्यक्ष अश्विन नाना टोम्पे,जिजाऊ ब्रिगेड जिल्हा अध्यक्ष राधा ताई सपकाळ, ओमकार पतंगे,संदीप शितोळे,अजित धपाटे,नानासाहेब हंडीबाग,मनोज चौधरी, शेखर थोरात, राज तपसे, राहुल रुपदास, महादेव थोरात, संकेत चव्हाण आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.


# माहिती अधिकार फेडरेशनच्या बीड जिल्हा अध्यक्ष पदी संपादक अजय भांगे यांची पुन्हा एकदा निवड

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**
माहिती अधिकार फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या आदेशाने तसेच कार्याध्यक्ष शेखर कोलते यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा अध्यक्षांच्या निवडीची प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत दैनिक वादळ वार्ताचे संपादक तथा सामाजिक कार्यकर्ते अजय भांगे यांची एकमताने बीड जिल्हा अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली.
गेल्या तीन वर्षांच्या कार्यकाळात अजय भांगे यांनी माहिती अधिकाराच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रशासनातील पारदर्शकता वाढवण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शेकडो तरुणांना आरटीआयबाबत मार्गदर्शन मिळाले असून अनेक प्रकरणांत जनहितासाठी लढे उभारण्यात आले आहेत. त्यांनी माहिती अधिकार कार्यकर्त्यांचे एक सशक्त जाळे उभे करून फेडरेशनची ताकद वाढवली आहे.फेरनिवडीनंतर अजय भांगे यांनी सांगितले की, माहिती अधिकार हा लोकशाहीतील सामान्य नागरिकाचा प्रभावी हक्क आहे. प्रशासनातील अनियमितता उघडकीस आणत पारदर्शक व जबाबदार शासनव्यवस्था निर्माण करणे हेच आमचे ध्येय आहे.या निवडीमुळे त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.



# रोटरीच्या इमर्जेन्सी रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**
केज रोटरीने आयोजित केलेल्या तातडीच्या रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळाला. केज शहरातील अकरा रक्तदात्यांनी आवाहन करताच तातडीच्या रक्तदान शिबिरात रक्तदान करून आपले सामाजिक दायित्व पार पाडले. सध्या संपूर्ण बीड जिल्ह्यात रक्तपेढ्यांना रक्ताचा तुटवडा भासतोय. दरवर्षी बीड जिल्ह्यात व राज्यात केवळ महापुरुषांच्या जयंत्या, नेत्यांचे वाढदिवस यासारख्या दिनविशेषच्या निमित्तानेच बहुतांश रक्तदाते रक्तदान करतात. मात्र वर्षातील कांहीं काळ दिनविशेष नसल्याने लोक रक्तदान करत नाहीत त्यामुळे या सायलेंट पिरियड मध्ये सर्वच रक्तपेढ्यामध्ये रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासतो.या काळात रक्तदान करणे गरजेचे आहे. केज रोटरी च्या वतीने अशा काळातच इमर्जेन्सी रक्तदान शिबिरे घेण्याचे ठरवले आहे.म्हणूनच केज रोटरीचे अध्यक्ष सत्यवान राऊत, सचिव प्रवीण देशपांडे, प्रोजेक्ट चेअरमन जितेंद्र देवधारे, अनिकेत पाटील व संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी केजच्या हनुमान मंदिर वकीलवाडी येथे तातडीचे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. यामध्ये ,शेख अर्षद बाबू ,अनिल जयवंत सत्वधर ,अंबाड सुरेश जयराम,महेश रामेश्वर जाजू,देशमूख बालाजी काशिनाथ ( विजय देशमुख



सर),अंकुर अभिमन्यू चाळक,प्रतीक हनुमंत भोसले,अरविंद त्र्यंबक बोबडे,समर्थ जोगदंड,किशोर इतापे,गणेश बजगुडे
या सामाजिक नायकांनी रक्तदान केले. यामुळे एकूण ३६ रुग्णांना रक्तपुरवठा करणे शक्य होणार आहे. वरील सर्व रक्तदात्यांचे केज रोटरीने कौतुक करून आभार व्यक्त केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष सत्यवान राऊत, सचिव प्रवीण देशपांडे, प्रोजेक्ट चेअरमन जितेंद्र देवधारे, संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले, रो दादा जमाले पाटील, रो महेश जाजू यांनी विशेष परिश्रम घेतले.

# स्वयंसेवकांच्या सत्कारामुळे समाजाचा दृष्टिकोन बदलेल–प्रा.चंद्रकांत डागा

## भारतीय जैन संघटनेतर्फे तळोदा येथे स्वयंसेवक सन्मान समारोह उत्साहात; १० सेवाभावी व्यक्ती व संस्थांचा सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**
सामाजिक सेवेत आपले महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या स्वयंसेवकांचा सत्कार करणे अत्यंत आवश्यक आहे. अशा सन्मानामुळे स्वयंसेवकांबद्दल समाजाचा दृष्टिकोन बदलेल आणि सकारात्मक व समृद्ध समाज निर्माण होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन भारतीय जैन संघटनेचे खान्देश विभाग अध्यक्ष प्रा. चंद्रकांत डागा यांनी केले.
ते तळोदा येथे भारतीय जैन संघटनेने आयोजित केलेल्या स्वयंसेवक सन्मान समारोह कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. भारतीय जैन संघटना आणि इतर स्वयंसेवी संस्थांमध्ये उत्कृष्ट सेवा कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांना पुरस्कृत करण्यासाठी हा कार्यक्रम



आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बोलताना प्रा. डागा पुढे म्हणाले की, स्वयंसेवक हेच संघटनेचा आधार आहेत. त्यांच्या सत्कारामुळे लोकांमध्ये समाजाप्रती जबाबदारी आणि आपापसातील सहकार्याची भावना वाढेल. स्वयंसेवेचे महत्त्व आणि चांगल्या समाज निर्मितीतील त्याची भूमिका लोकांना समजून, ते सेवाकार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित होतील. यावेळी निराधार गरीब, नर्मदा परिक्रमा करणारे, गरीब रुग्ण व अपघातातील नागरिकांना सेवा देणारे अशा दहा सेवाभावी व्यक्ती व संस्थांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सन्मानित पुरस्कारार्थींची नावे:- योगेश चव्हाण,डॉ. योगेश बडगुजर,पुष्पेन्द्र दुबे,संतोष माळी,गिरधन पावरा,ड. अल्पेश जैन,चेतन बैरागी,रोकड मन अन्नछत्र परिवार, नैवेद्य फाउंडेशन.,सहयोग सोशल ग्रुप. या कार्यक्रमाला प्रा. डागा यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणून तळोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजू लोखंडे, विभागीय सचिव अशोक राखेचा, कीर्ती कुमार शहा, जीवनलालजी भन्साली, गेनमल कोचर यांच्यासह पूजा जैन, रसीलाबेन देसाई, अमिबेन तुर्खिया, राजेंद्र जैन, डॉ. संजय शर्मा, प्रा. जयपालसिंग शिंदे, अशोक सूर्यवंशी, राजेश चौधरी, प्रा. रमेश मगरे, पंडित भामरे, राजाराम राणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद सूर्यवंशी यांनी केले, तर आभार ड. अल्पेश जैन यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राकेश जैन, आशिष जैन, कुशल जैन, पारस जैन, दीपेश जैन व सर्व बी जी एस कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय


# जगज्जे 'त्या'




१९८३ साली भारताच्या पुरूष संघाने एकदिवसीय विश्वचषक जिंकला. १९८३ साली त्या वेळी बहुतेकांकडे टीव्ही नव्हते. पण तो क्षण भारतीय महिलांनी पुन्हा काल देशवासीयांना अनुभवाला आणून दिला. असंख्य भारतीयांनी हा थरार 'याचि देही याचि डोळा' पाहिला. महिला क्रिकेटने आता बरीच कात टाकली आहे. महिला क्रिकेटमध्ये अनेक सुपरस्टार महिला तयार झाल्या आहेत. त्यात हरमतप्रीत कौर, शफाली वर्मा, दीप्ती वर्मा आणि अमनज्योत कौर यांनी आपापले योगदान दिले आणि २०२५ चा विश्वचषक भारताच्या नावावर कोरला. भारताची फिरकीपटू दीप्ती वर्माने पाच विकेट घेतल्या, तर शफाली शर्माने तडाखेबंद ८७ धावांची खेळी करत भारताला २९९ धावांचे लक्ष्य गाठून दिले. भारतात काही ठिकाणी महिलांना कमी लेखले जाते. अशावेळी महिलांनी केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरते. क्रिकेटच नव्हे तर बुद्धिबळपटू दीप्ती देशमुख, पी. टी. उषा आणि अश्विनी नाचप्पा आणि मेरी कोम अशा कित्येक रणरागिणींनी यापूर्वीच 'छोरियां छोरो से कम नही है' हे वारंवार सिद्ध केले आहे. भारतीय महिला क्रिकेटपटूंनी तेच पुन्हा सिद्ध केले. पूर्वी अनेकदा असा प्रश्न विचारला जायचा की, पुरुषांच्या सामन्यात जितका उत्साह दिसत असे तितका तो महिलांच्या सामन्यात का दिसत नाही. पण रविवारचा नवी मुंबईत डी. वाय. पाटील स्टेडियममधला जल्लोष बघून हा प्रश्न पुन्हा कुणालाही पडणार नाही याची खात्रीच झाली आहेभारतीय महिलांना अनेकदा दुर्लक्षित केलेले आहे. तो इतिहास आता इतिहासजमा झाला आहे आणि पुरुषांइतक्याच सामर्थ्याने त्या आता देशाची धुरा प्रत्येक क्षेत्रात वाहून नेण्यास समर्थ आहेत हाच तो अर्थ आहे. या संघात सहभागी असलेल्या प्रत्येक खेळाडूची वेगळी अशी कहाणी आहे. प्रतीका रावलच्या दुखापतीमुळे ऐन वेळेला संघात स्थान मिळवलेल्या शफाली वर्माने तडाखेबंद ८७ धावांची खेळी करून इतिहास घडवला. हरमनप्रीत असो की स्मृती मानधना असो, यांची कथा अशीच आहे. पण दुर्दैव हे आहे की, यांच्या कथांना आजही लोक तितके महत्त्व देत नाहीत. सचिन तेंडुलकर किंवा कपिल देव यांच्या किस्से-कहाण्यांना जितके प्रेरणादायी मानले जाते तितके महिला खेळाडूंच्या प्रेरणादायी कहाण्यांना महत्त्व दिले जात नाही. विशेष म्हणजे या सर्व खेळाडू ग्रामीण भारतातून आल्या आहेत. कुणी हरियाणाची आहे, तर कुणी हिमाचल प्रदेशची आहे. तेथून यांच्या प्रेरक कहाणीला प्रारंभ होतो आणि आता विश्वचषक घेऊनच त्या एका टप्प्यावर आल्या आहेत.तसे तर आता पुरुष खेळाडूंनीही आता ग्रामीण भागातून देशात क्रिकेटला उंचीवर नेऊन ठेवले आहे. जे हरभजनसिंग आणि युवराज सिंग यांनी केले तेच हरमनप्रीत आणि शफाली वर्मा यांनी केले. भारतीय महिला विश्वचषक संघ हा भारताचेच विश्वरूप आहे. जेमिमा रॉड्रिक्सने भारताला अंतिम फेरीत पोहोचवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. प्रत्येक खेळाडूने आपला वाटा उचलला आहे. या विजयामुळे बीसीसीआयचा महिला संघाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल. स्पर्धेदरम्यान भारतीय खेळाडूंनी ज्या प्रकारे आपला खेळ उंचावला आणि इतरांना प्रेरणा दिली ती कित्येक वर्षे स्मृतीत राहील. ८३ नंतर भारतीय क्रिकेटचे स्वरूप बदलून गेले. तेच आता महिलांच्या बाबतीत होणार आहे. आताच भारतीय लहान मुली हातात बॅट घेऊन दिसू लागल्या आहेत. जे पूर्वी टेनिसच्या बाबतीत इंग्लंड आणि फ्रान्समध्ये व्हायचे तेच आता क्रिकेटच्या बाबतीत भारतात घडत आहे. हे निश्चितच चांगले आहे. हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली मोठ्या धावांचा पाठलाग या विश्वषकात अंतिम सामन्याअगोदर भारतीय संघाने पूर्ण करून दाखवला. ही एक भारतीय महिलांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल होत असल्याची बाब पटवून देते. रॉड्रिक्स असो की हरमनप्रीत असो की शफाली वर्मा असो की रिचा घोष या सर्वांनी भारतीयांना विश्वचषक जिंकल्याचा पुन्हा एकदा परमानंद दिला आहे. यात दक्षिण आफ्रिका हरले याचा आनंद नाही, तर भारतीय महिला आज जगज्जेत्या आहेत आणि त्या कुणालाही हरवू शकतात याचा आनंद मोठा आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, आयसीसी वर्ल्डकप अंतिम सामन्यात भारतीय महिलांची कामगिरी महान कौशल्य आणि आत्मविश्वासाची फलित होते. संघाने अपवादात्मक सांघिक टीमवर्क आणि दृढता दाखवली. आता भारतीय महिलांना चांगले दिवस आले आहेत. बीसीसीआयने त्यांना भरघोस पारितोषिके प्रदान करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे भारतीय महिला आता चांगले प्रशिक्षण घेऊ शकतील आणि भारतीय खेळाडूंचा दर्जा आणखी वाढेल. हा या विजयाचा आणखी एक सुपरिणाम आहे. ठिकठिकाणच्या ग्रामीण भागातून आलेल्या महिलांना आता क्रिकेटच्या सुविधा प्राप्त होतील यात काही शंका नाही. पूर्वी त्या उत्तम परिस्थितीत असलेल्या खेळाडूनाच उपलब्ध होत होत्या. आता त्या सर्वसामान्य खेळाडूंनाही प्राप्त होतील निदान याची सुरुवात तरी होईल. क्रिकेट म्हणजे साहेबांचा खेळ असा समज होता. तो समज आता भारतीय पुरुषांनी घालवला आणि आता तर भारतीय स्त्रियांनीही पुसून टाकला आहे, त्यामुळे इंग्लंडपेक्षा आपण या खेळात पुढे आहोत हे सिद्ध झाले आहे.

# सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' विशेष स्वरूपात साजरा होणार

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. या वर्षी त्यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने हा दिवस भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे. हा दिवस भारताच्या एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकजुटतेचे प्रतीक असून, ५६२ संस्थान एकत्रित येऊन आधुनिक भारताची पायाभरणी करणाऱ्या सरदार पटेलांच्या अद्वितीय कार्याला अभिवादन करणार आहे. एकतानगर येथे भव्य परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम या वर्षीचा उत्सव नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक समृद्धीचा संगम असणाऱ्या गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकतानगर येथे आयोजित केला जाणार आहे. हे ठिकाण विविधतेत एकता या भारताच्या संकल्पनेचे प्रतीक म्हणून निवडले गेले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे केंद्रीय सशस्त्र पोलीस दल राज्य पोलीस दल आणि राष्ट्रीय कॅडेट कोर यांच्या सहभागाने भव्य परेड आणि सांस्कृतिक उत्सव आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय कॅडेट्स कोर आणि शालेय बँड यांचे सादरीकरण या परेडमध्ये सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, भारत- तिबेट सीमा पोलीस, सशस्त्र सीमा बल तसेच आसाम, त्रिपुरा, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, केरळ आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या पोलीस दलांचा सहभाग असेल. घोडदळ आणि उंटदळाचे संच, स्वदेशी जातींच्या श्वानांचे कौशल्य प्रदर्शन, मार्शल आर्ट सादरीकरणे आणि शस्त्रविरहित युद्धकौशल्याची प्रात्यक्षिके या परेडची शोभा वाढवतील. महिला सक्षमीकरणावर विशेष भर देत, प्रधानमंत्री यांना दिल्या जाणाऱ्या गार्ड ऑफ ऑनरचे नेतृत्व एक महिला अधिकारी करतील. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल आणि केंद्रीय राखीव बल च्या महिला कर्मचाऱ्यांकडून मार्शल आर्ट आणि युद्धकौशल्याचे प्रभावी प्रदर्शन सादर केले जाईल. याद्वारे त्यांचे शौर्य, शिस्त आणि आत्मविश्वास प्रकट होईल. राष्ट्रीय सुरक्षेत विशेष योगदान दिले आहे असे रामपूर हाउंड आणि मुधोल हाउंड हे स्वदेशी श्वान आपली कौशल्ये सादर करतील. विशेष म्हणजे, अखिल भारतीय पोलीस श्वान स्पर्धेत विजेती ठरलेली 'मुधोल हाउंड रिया' या वर्षीच्या परेडमध्ये डॉग स्क्वाडचे नेतृत्व करेल. याशिवाय, गुजरात पोलिसांचे घोडदळ, आसाम पोलिसांचा मोटरसायकल डेअरडेव्हिल शो, सीमा सुरक्षा बल चे उंटदळ आणि उंट बँड, तसेच एनसीसी कॅडेट्स आणि शालेय बँड एकतेतच शक्ती आहे हा संदेश देत परेडमध्ये सहभाग घेतील. भारतीय वायुदलाच्या सूर्यकिरण पथकाकडून सादर होणारा भव्य एअर शो या परेडच्या भव्यतेत आणखी भर घालेल.
quot;विविधतेत एकताquot; संदेश देणारे



संचलन राष्ट्रीय एकता दिनी परेडमध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांचे संचालन 'विविधतेत एकता' या विषयाचे दर्शन घडवतील. या संचालनात राष्ट्रीय सुरक्षा गार्ड, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, गुजरात, जम्मू आणि काश्मीर, अंदमान-निकोबार बेटे, मणिपूर, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तराखंड आणि पुदुचेरी यांच्या संचालनाचा समावेश असेल. यासह सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, सशस्त्र सीमा बल, दिल्ली पोलीस आणि विविध राज्य पोलीस दलांचे ब्रास बँड कार्यक्रमाच्या उत्सवी वातावरणात अधिक रंग भरतील. या परेडमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दल चे पाच शौर्यचक्र विजेते आणि सीमा सुरक्षा बल चे १६ वीरता पदक विजेते सन्मानित केले जातील. या शूर जवानांनी नक्षलविरोधी आणि दहशतवादविरोधी मोहिमांमध्ये, तसेच पश्चिम सीमेवरील 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान, अद्वितीय धैर्य आणि पराक्रमाचे प्रदर्शन घडविले आहे. परेडसोबतच भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाद्वारे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात ९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण करतील, ज्यातून भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि विविधतेतील सौंदर्य अधोरेखित होईल. राष्ट्रीय एकता दिनाचे उद्दिष्ट नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकता, सौहार्द आणि देशभक्तीची भावना दृढ करणे हे आहे. हा उत्सव प्रत्येक भारतीयाला या मूल्यांचा स्वीकार करण्यासाठी आणि देशाच्या ऐक्याच्या भावनेला बळ देण्यासाठी प्रेरित करतो. १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एकतानगर येथे 'भारत पर्व' आयोजित करण्यात येईल. या पर्वात संपूर्ण भारतातील सांस्कृतिक सादरीकरणे आणि खाद्य महोत्सव आयोजित केला जाईल, ज्यामध्ये देशाच्या विविध परंपरांचा संगम पाहायला मिळेल. या पर्वाचा समारोप १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करून केला जाईल.

**- वर्षा फडके-आंधळ**

## महायुती सरकारकडून शेतकऱ्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न

# कोणत्याही परिस्थितीत कर्जमाफी झाली पाहिजे-हर्षवर्धन सपकाळ


शमतदार याद्यांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात घोळ आहेत हे काँग्रेस पक्षाने सर्वात आधी पुराव्यासह दाखवून दिले आहे. पण निवडणूक आयोग त्याची गंभीरपणे दखल घेत नाही. झोपलेल्या या निवडणूक आयोगाला जागे करण्यासाठी सर्व पक्षांनी १ नोव्हेंबरला भव्य मोर्चाचे आयोजन केले असून या मोर्चात काँग्रेस पक्ष सहभागी होणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे.
यासंदर्भात बुलढाणा येथे पत्रकारांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मुंबईत आज १ नोव्हेंबरच्या मोर्चाचा अनुषंगाने बैठक आयोजित केलेली होती पण काही वैयक्तीक व घरगुती कामामुळे मी या बैठकीला उपस्थित राहू शकलो नाही पण काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते. १ तारखेच्या मोर्चातही काँग्रेस पक्षाचा सहभाग असणार आहे. या बैठकीला वा मोर्चात कोण सहभागी होणार हे गौण असून मुद्दा महत्वाचा आहे असेही सपकाळ म्हणाले.
बच्चु कडू यांच्या आंदोलनावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, सरकार कधी पोलिसांना तर कधी कोर्टाला पुढे करून मुख्य मुद्द्यापासून पळ काढत आहे. कोर्टाला पुढे करून सरकार शेतकऱ्यांचा आवाज दडपून टाकण्याचा प्रयत्न करत आहे. सरकारमध्ये हिम्मत असेल तर पुढे येऊन चर्चा केली पाहिजे. निवडणुकीच्या प्रचारात शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले व आता कर्जमाफी करण्यास वेळकाढूपणा का केला जात आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे.


# बाथरूम,रेस्टरूम,टॉयलेट आणि वॉशरूममध्ये नेमका काय फरक?

आजकाल बाथरूम, टॉयलेट या शब्दासोबतच रेस्टरूम आणि वॉशरूम असेही अनेक शब्द ऐकले असतील. पण नक्की यातील फरक काय? या जागा जवळपास सारख्याच असल्या तरी त्यांची नावे आणि अर्थ वेगळे कसे काय? या जागांसाठी वेगवेगळे शब्द का वापरले जातात? पण उपयोग वेगवेगळे आहेत. याबद्दसल जवळपास ९० टक्के लोकांना माहित नसेल. चला जाणून घेऊयात.
**बाथरूम**बाथरूम म्हणजे अशी जागा जिथे आपण आंघोळ करतो आणि स्वतःला स्वच्छ करतो. त्यात सामान्यतः कमोड, सिंक आणि बाथटबचा समावेश असतो. बाथरूम पूर्वी घराच्या इतर भागांपासून दूर असायचे, परंतु आता ते बहुतेकदा बेडरूम किंवा हॉलला एकत्रित जोडलेले असते. बाथरूम हा शब्द फक्त शौचालयासाठी वापरणे चुकीचे आहे. बाथरुम या शब्दासोबतच वॉशरूम किंवा शौचालय देखील तुम्ही म्हणू शकता.

**वॉशरूम**

वॉशरूममध्ये शौचालय आणि हात धुण्याची सुविधा असते. त्यात सहसा आंघोळीसाठी जागा नसते.





मॉल, शाळा, सिनेमा हॉल आणि ऑफिसमध्ये जी शौचालये त्या जागा बाथरूमपेक्षा लहान असतात आणि ती केवळ स्वच्छतेसाठी वापरली जातात. त्यामध्ये अनेकदा आरसा आणि कपडे बदलण्याची जागा देखील असते. म्हणून त्यांना वॉशरुम म्हणतात.

**टॉयलेट**

शौचालय म्हणजे अशी जागा जिथे फक्त लघवी किंवा शौचासाठीच असते. त्यात सिंक आहे पण आंघोळीसाठी किंवा कपडे बदलण्यासाठी कोणतीही सुविधा नाही. शौचालये सामान्यतः लहान असतात आणि विशेषतः बस स्टँड, मॉल किंवा रेल्वे स्टेशनसारख्या सार्वजनिक ठिकाणी आढळतात.

**रेस्टरूम**

रेस्टरूम या शब्दाचा अर्थ आराम करण्याची जागा असा होतो असे अनेकांना वाटते, पण ते खरे नाही. अमेरिकेत हा शब्द शौचालयाचा संदर्भ वापरला जातो. तिथले लोक त्याला रेस्टरूम म्हणतात. म्हणून, जेव्हा तुम्ही मॉल किंवा हॉटेलमध्ये रेस्टरूम लिहिलेले पाहता तेव्हा हे लक्षात घेतले पाहिजे की ते स्वच्छतागृह आहे, आराम करण्याची जागा नाही.

**लॅव्हिटरी**

विमानाच्या बाथरूमला लॅव्हिटरी म्हणतात. विमानात एक छोटासा खोलीसारखा भाग असतो जिथे शौचालय आणि वॉश बेसिन असते. याला लॅव्ह असेही म्हणतात. लॅव्हिटरी हा शब्द 'लॅव्हेटोरियम' या लॅटिन शब्दापासून आला आहे, ज्याचा अर्थ 'धुण्याची जागा' असा होतो. लव्हिटरी या शब्दाचा एक संक्षिप्त प्रकार आहे, जो ब्रिटिश इंग्रजीमध्ये सामान्यपणे वापरला जातो. विमानातील बाथरूममध्ये व्हॅक्यूम फ्लश सिस्टीमचा वापर केला जातो, ज्यामुळे आवाज येतो आणि कचरा बाहेर काढला जातो.

# कोरडी आणि लालसर त्वचेच्या समस्येपासून मुक्तता मिळवण्यासाठी दररोज चेहऱ्याला लावा 'या' ३ गोष्टी

बदलत्या वातावरणामुळे अनेकांना त्वचेच्या समस्या भेडसावत असतात. तसेच त्वचेची योग्य काळजी न घेतल्यानेही त्वचेचा समस्या निर्माण होतात, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या चेहऱ्यावर होतो. या निष्काळजीपणामुळे वेळोवेळी पुरळ, मुरुमे आणि विविध त्वचेच्या लर्जी होत असते.त्यात अधिकतर लोकांची त्वचा लालसर आणि कोरडी पडणे अशा समस्यांचा सामना करावा लागतो आणि ही समस्या विशेषतः गाल आणि नाकाभोवती जास्त सतावत असते. तर आजच्या लेखात आपण काही सोपे आणि घरगुती उपाय जाणून घेणार आहोत जे तुम्हाला निरोगी, स्वच्छ, चमकदार आणि तेजस्वी त्वचा राखण्यास मदत करतील.

**चेहऱ्यावर लालसरपणा का येतो?**

चेहरावर लालसरपणा आणि कोरडेपणा येण्याची अनेक सामान्य कारणे आहेत. सर्वात सामान्य कारण म्हणजे तुमच्या त्वचेच्या टोननुसार योग्य प्रोडक्ट न निवडणे. शिवाय वारंवार चेहऱ्याला स्पर्श करणे आणि फेस वॉश व जास्त केमिकलचा वापर असलेल्या इतर ब्युटी प्रोडक्टचा वापर केल्याने चेहऱ्यावर लर्जीची समस्या निर्माण होते. ज्यामुळे चेहरा लालसर आणि कोरडा होतो. तर या समस्यापासून सुटका मिळवण्यासाठी खालील उपायाचा अवलंब करा.



**नारळ तेलाचा चेहऱ्यावर परिणाम दिसून येईल**

नारळाचे तेल केवळ जळजळ होणाऱ्या त्वचेसाठीच नाही तर त्वचेच्या इतर अनेक समस्यांवर उपचार करण्यासाठी देखील फायदेशीर मानले जाते. कोरड्या आणि लाल त्वचेपासून मुक्त होण्यासाठी दररोज रात्री झोपण्यापूर्वी गालावर व त्वचेवर नारळाचे तेल लावा. या उपायाचा नियमित वापर केल्याने आठवड्यातून तुमची लर्जी कमी होण्यास मदत होऊ शकते. जर तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही नारळाच्या तेलाऐवजी तीळाचे तेल देखील वापरू शकता.

**चेहऱ्यावर ग्लिसरीन लावा**

चेहऱ्याची त्वचा खूपच नाजूक असते आणि जेव्हा त्वचेवर केमिकलचा अधिक वापर असलेल्या ब्यूटी प्रोडक्टचा वापर चेहऱ्यावर केल्याने त्वचा लवकर कोरडी आणि निर्जीव होऊ शकते . ग्लिसरीन हे नाजूक त्वचेसाठी एक उत्कृष्ट नैसर्गिक उपाय आहे, कारण ते केवळ त्वचेला बरे करत नाही तर ओलावा टिकवून ठेवण्यास देखील मदत करते. तथापि, ग्लिसरीन थेट त्वचेवर लावू नका याची काळजी घ्या. ग्लिसरीन लावताना नेहमी गुलाबपाणी किंवा नारळाच्या तेलात मिक्स करून ते चेहऱ्यावर लावा.

**जेल-बेस्ड मॉइश्चरायझर लावा**

बऱ्याचदा आपण आपल्या त्वचेचा प्रकार योग्यरित्या ओळखत नाही, म्हणूनच बहुतेक लोक फोमिंग क्लींजरचा वापर करतात. पण जेव्हा या क्लींजरचा वापर करतो तेव्हा त्वचेचा नैसर्गिक ओलावा निघून जातो, ज्यामुळे त्वचा आणखी कोरडी होते. म्हणूनच तुमच्या त्वचेचे कोरडेपणापासून संरक्षण करण्यासाठी आणि त्वचेला पोषण मिळावे यासाठी जेल-बेस्ड मॉइश्चरायझर किंवा क्लींजर वापरणे आवश्यक आहे. जेल-बेस्ड उत्पादने कोरडेपणा टाळतात आणि आवश्यक आर्द्रता प्रदान करून त्वचेला पोषण देतात.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

तुम्हाला जर तुमच्या चेहऱ्यावर विशेषतः गालावर आणि नाकाभोवतीच्या भागात बऱ्याच दिवसांपासून लालसरपणा आणि कोरडेपणा जाणवत असेल तर कोणताही विलंब न करता ताबडतोब त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या.
यासोबतच तुमच्या चेहऱ्याला वारंवार स्पर्श करू नका आणि चेहऱ्यावर नखांचा स्पर्श होऊ देऊ नका याची विशेष काळजी घ्या, कारण असे केल्याने त्वचेची ही समस्या आणखी वाढू शकते.

# सीपीआर देवूया या डॉ.घाळे यांच्या जनजागृतीपर गीताच्या पोस्टरचे विमोचन

दैनिक वादळ वार्ता
**उदगीर । प्रतिनिधी**

मानसी प्रोडक्शन प्रस्तुत आणि निर्माती डॉ. भाग्यश्री घाळे यांनी सीपीआर शिकू या! या जनजागृतीपर गीताची निर्मिती केली आहे. सर्व वयोगटांमध्ये सीपीआर विषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.या गाण्यात स्वतः डॉ. भाग्यश्री घाळे यांनी अभिनय केला असून, गीताचे चित्रीकरण ब्राईट स्टार इंग्लिश स्कूल, उदगीर येथे संपन्न झाले आहे.

गीताचा व्हिडिओ अत्यंत दर्जेदार असून, बालमनात सीपीआरबद्दल माहिती आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा या गाण्याचा हेतू आहे.

सीपीआर ही अशी जीवनरक्षक प्रक्रिया आहे, जी हृदयविकाराचा झटका किंवा श्वसन थांबल्यानंतर त्वरित वापरल्यास व्यक्तीचा जीव वाचवू शकते.

यात कोणतेही औषध, इंजेक्शन किंवा डॉक्टरची



तात्काळ गरज नसते फक्त योग्य पद्धतीने केलेले छातीवरील दाब आणि श्वसन इतकेच पुरेसे असते.

हा महत्त्वपूर्ण आणि प्रामाणिक संदेश या गीतातून डॉ. भाग्यश्री घाळे यांनी प्रभावीपणे मांडला आहे.

गीतामध्ये डॉ. रामप्रसाद लखोटिया हे सीपीआरचे महत्त्व सांगताना दिसतात.

गीताचे सहलेखन डॉ. भाग्यश्री घाळे, लेखन व दिग्दर्शन कृष्णा काकरे., डीओपी सुनील डोंगरे, संकलन विठ्ठल वाघमारे, स्टील फोटोग्राफी नागेश स्वामी, पोस्टर डिझाईन मनोज झुंगा, तर संगीत गौरव चव्हाण यांनी केले आहे.

तसेच ब्राईट स्टार हायस्कूलचे संचालक प्रा. डॉ. वीरभद्र घाळे, प्राचार्या प्रेमलता घाळे मॅडम तसेच महिला शिक्षकांनीही यात अभिनय केला आहे.पवन राठोड, सिद्धू स्वामी, जयदीप पवार यांनीही गीतात भूमिका साकारल्या आहेत.

डॉ. भाग्यश्री घाळे म्हणाल्या, गेल्या दहा वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात कार्य करताना मी अनेक आपत्कालीन प्रसंग पाहिले आहेत. त्यामुळे सीपीआरची माहिती प्रत्येक सामान्य नागरिकाला असावी, या हेतूने हा उपक्रम केला आहे. पुढेही ऑडिओ-व्हिडिओ माध्यमातून आरोग्य जनजागृतीचे कार्य सातत्याने करत राहू.पोस्टरचे भव्य अनावरण उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय येथे करण्यात आले.

या वेळी प्रमुख अतिथी म्हणून सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री आ. संजय बनसोडे, तसेच डॉ. रामप्रसाद लखोटिया, प्रदीप बेद्रे, ड. व्यंकट मोरे, इश्वरप्रसाद बाहेती,प्रा. महेश बसपुरे, ड. बालाजी आडेप्पा, सुमीत वाकुडे, सुरेश देबडवार आदी मान्यवर उपस्थित होते.

हे गीत लवकरच मानसी प्रोडक्शन ऑफिशियल या यूट्यूब चॅनेलवर प्रदर्शित होणार आहे.

गीताद्वारे सीपीआरविषयी जनजागृती निर्माण होऊन समाजात जीवन रक्षणाचे महत्त्व पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.लवकरच या गीताचे भव्य स्क्रिनिंग आयोजित करण्यात येणार असल्याचे डॉ. भाग्यश्री घाळे यांनी सांगितले.

## प्रसिद्ध अभिनेत्री अल्का कुबल हस्ते रेखाताई बनसोडे लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्काराने सन्मानित

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

शिव शाहू फुले आंबेडकर अण्णाभाऊ यांच्या विचार प्रेरणेतून कामाई देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष नात्याने सामाजिक सेवेची वृत्त अंगी घेऊन गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक बालक आश्रम चालविणारे मौजे शेळगाव छत्री येथील रेखाताई बनसोडे देवकर यांना नुकताच मुंबईतील लोकसंसद जन प्रेरणा शिखर पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री अलका कुबल यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक निस्वार्थी समर्पण दूरदृष्टी आणि प्रेरणादायी प्रयत्न करणाऱ्या श्रीमती रेखाताई बनसोडे देवकर यांच्या कार्याची दखल घेऊन विश्वनायक लोकसंसद फाउंडेशनच्या वतीने मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे दिनांक २८ ऑक्टोबर रोजी दिग्दर्शक मनमोहन देसाई,अभिनेता रोहित



कोकाटे,अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड,आयुष्यमान भारतचे अध्यक्ष ओम प्रकाश शेट्टे, सदर संस्थेचे अध्यक्ष सुरेश यादव या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रसिद्ध अभिनेत्री अलका कुबल यांच्या हस्ते लोकसंसद जन प्रेरणा शिखर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले या सन्मानावेळी व्यंकट पाटील हंबर्डे यांचीही उपस्थिती होती प्रसिद्ध मान्यवर आणि महत्त्वपूर्ण पुरस्कार प्रदान प्राप्त झाल्यामुळे रेखाताई बनसोडे देवकर यांचे शेळगाव छत्री येथील युवा कार्यकर्ते तानाजी पाटील आणेराये, अशोक कुंभार, भास्कर पाटील आणेराये, साईनाथ महाराज,रेखाताई यांचे नांदेड जिल्ह्याचे गौरी गुरू व त्यांचा सर्व संच आणि सय्यद अशीफा,बालाजी वारले,संजय लांडगे,बालाजी आर्मी,संतोष किन्हाळकर,सुनंदा जोगदंड, मनमथ मालेगावे यासह अनेकांनी रेखाताई बनसोडेचे अभिनंदन करून भावी कार्यास भरभरून शुभेच्छा दिले आहे.

## अपघातात एकाचा मृत्यू तर दुसऱ्यास गंभीर दुखापत झालेल्या गुन्ह्यातून आरोपी दत्ता रामभाऊ पटाईत याची निर्दोष मुक्तता

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब श्री.आर. ए.मिसाळ साहेब यांनी दिनांक ०१/११/२०२५रोजी आरोपी दत्ता रामभाऊ पटाईत, याची अपघातात एकाचा मृत्यू तर दुसऱ्याच गंभीर दुखापत झाले बाबतच्या गुन्ह्यातून पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आहे .



घटने बाबत सविस्तर हकीकत अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतीत अपघाताची घटना घडली असून दिनांक २२/०१/२०१९रोजी सायंकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास फिर्यादी प्रवीण प्रकाशचंद अब्बड, व वडील नावे प्रकाशचंद मोतीलाल अब्बड, व त्यांच्या गावातील भागवत निवृत्ती भायगुडे, असे तिघे उभे असताना माजलगाव कडून येणारा भरधाव वेगातील रिक्षा याने माझ्या वडिल प्रकाशचंद अब्बड, व भागवत भायगुडे, यांना जोराची धडक दिली व माझे वडील प्रकाशचंद अब्बड, यांना रुग्णालयात येण्यापूर्वीच प्रकाशचंद अब्बड ,हे मयत झाले होते असे डॉक्टर यांनी तपासून सांगितले व भागवत भायगुडे, याना गंभीर दुखापत झाली अशा पद्धतीची फिर्याद आरोपी दत्ता रामभाऊ पटाईत, याच्या विरोधात पोलीस स्टेशन तलवाडा येथे गु.र. नं. ०२/१९ कलम २७९, ३०४(-),३३७,३३७भा.द.वी प्रमाणे व कलम १३४/१७७,३(१)/१८१,१४६/१९६ मोटर वाहन कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता त्यानंतर श्री.जी. ए.मिसाळ यांनी गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करून आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र मा.न्यायालय गेवराई येथे दाखल केले.व दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर आरोपी याने गुन्हा न केल्याचे कबूल केल्यानंतर सरकार पक्षाने आरोपी विरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकामी सरकार पक्षातर्फे एकूण दहा साक्षीदार तपासण्यात आले.त्यामध्ये मयत व्यक्तीचा मुलगा फिर्यादी प्रवीण अब्बड, व ज्याच्या वडीलास गंभीर दुखापत झाली असे श्रीनिवास भायगुडे, व वाहन मालक शेषराव महादेव निकम, व इतर सात साक्षीदार यांना तपासण्यात आले. असे एकूण दहा साक्षीदार तपासल्यानंतर सरकार पक्षाचा व बचाव पक्षातर्फे अँड पी.एम. पटेकर, यांचा जोरदार युक्तिवाद ऐकल्यानंतर पुराव्या अभावी आरोपी दत्ता रामभाऊ पटाईत, याची निर्दोष मुक्तता करण्यात आली. सदर प्रकरणात विधीज्ञ श्री. प्रकाश महादेवराव पटेकर, यांनी आरोपीच्या वतीने चांगल्या प्रकारे कामकाज पाहिले आहे.

# जिल्हा रुग्णालयातील अत्याधुनिक कॅथलॅब युनिटमुळे हजारो रुग्णांना हृदयविकारावर मोफत व तातडीने उपचार मिळतील-डॉ.सुजय विखे पाटील

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर येथे अत्याधुनिक कार्डियाक कॅथलॅब युनिटचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या युनिटचे उद्घाटन माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

याप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक संजय गोगरे डॉ नागरगोजे . डॉ. मुंडे, डॉ. गाडे, जिल्हा शहराध्यक्ष अनिलराव मोहिते, अशोक गायकवाड, अतुल चिटणीस, गाडगे महाराज बाबू शेठ टायरवाले सानप, शेळके साहेब, बाबुराव विविध विभागांतील अधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. विखे म्हणाले, नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेबांच्या प्रयत्नातून जिल्हा नियोजन निधीतून सिव्हिल हॉस्पिटल साठी वेगवेगळ्या कारणाने ७५ कोटी रुपयांचा निधी अहिल्यानगरसाठी मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या सहकार्यामुळे जिल्ह्याच्या जनतेसाठी ही आरोग्यसेवेची मोठी भेट मिळाली आहे.

त्यांनी पुढे सांगितले, महायुती सरकारने आरोग्यसेवा,



शिक्षण आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रात जेवढं काम केलं ते मागील काही वर्षांत कधीच झालं नव्हतं. जिल्हा रुग्णालय हे गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांच्या आरोग्यसेवेत कार्यरत असून कोविड काळात या रुग्णालयाने उल्लेखनीय सेवा बजावली. त्या काळात अनेक रुग्णांचे प्राण वाचविण्यात सिव्हिल हॉस्पिटलने मोलाची भूमिका बजावली. याच अनुभवातून प्रेरणा घेऊन, आज अत्याधुनिक कार्डियाक कॅथलॅब युनिट सुरू करण्यात आले आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी या प्रसंगी सांगितले की, सरकारतर्फे उपलब्ध होत असलेल्या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांनाही हृदयरोगावरील उच्च दर्जाच्या उपचारांची सुविधा मोफत मिळावी हा हेतू या युनिटमागे आहे. पूर्वी खाजगी रुग्णालयांमध्ये कराव्या लागणाऱ्या महागड्या तपासण्या आणि उपचार आता जिल्हा रुग्णालयात सुलभ आणि मोफत मिळणार आहेत. ही सेवा जनतेसाठी एक मोठी दिलासा ठरणार आहे. ते पुढे म्हणाले, आज महायुती सरकारच्या माध्यमातून जिल्ह्याला १८ कोटी रुपयांची आरोग्य सुविधा अर्पण केली आहे. पुढील काळातही आम्ही एकजुटीने राहून अहिल्यानगरच्या विकासासाठी प्रत्येक योजना पूर्ण करू.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, जिल्हा रुग्णालयात सुरू झालेल्या या अत्याधुनिक युनिटमुळे जिल्ह्यातील हजारो हृदयरुग्णांना नवीन जीवनदान मिळेल. शासनाच्या मदतीने आणि जनतेच्या पाठबळावर आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे.

या कॅथलॅब युनिटमुळे हृदयरोग निदान व उपचार यासाठी लागणारी सर्व आधुनिक यंत्रणा उपलब्ध झाली आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेसह इतर शासकीय योजनांमधूनही नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येणार आहे.डॉ. विखे यांनी आपल्या भाषणात विद्यमान खासदार निलेश लंके यांच्यावर तीव्र शब्दात टीका केली. ते म्हणाले, मागच्या एका वर्षात मी जेवढं काम केलं, त्याच्या दोन टक्के सुद्धा काम आजच्या खासदाराने केलं नाही. माझा पराभव झाला, पण मी जनतेसाठी थांबलो नाही. जनतेला काही लोकांच्या भरोशावर सोडणं योग्य नाही. आम्ही थांबलो असतो तर जिल्ह्याचा विकासच थांबला असता. तसेच अहिल्यानगर शहरात ५११ एकर मधे एमआयडीसी उभारण्याचा आमचा निर्धार आहे. जमीन दिली आहे, सातबाऱ्यावर बोजा चढवला आहे. न्यायालयीन अडथळे असूनही पुढील सहा महिन्यांत एमआयडीसी सुरू होईल. अशा विश्वास यावेळी दिला.

वैद्यकीय महाविद्यालयाबाबत स्पष्ट शब्दांत ते म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना नगर शहरातच होईल. दुसरीकडे नेण्याचा प्रश्नच नाही. हा शब्द मी राधाकृष्ण विखे पाटील साहेब आणि आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने देतो.

शेवट भाषणात डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले आगामी काही दिवसांत आम्ही दहा कोटी रुपयांच्या खर्चाने महिला प्रशिक्षण केंद्र उभारणार आहोत. या केंद्रात शहरी आणि ग्रामीण महिलांना बचत गटांमार्फत रोजगार प्रशिक्षण दिलं जाईल, जेणेकरून त्या स्वावलंबी बनतील.

आपल्या भाषणाच्या शेवटी डॉ. विखे म्हणाले, मतदान ही लोकशाहीची ताकद आहे. चुकीचा माणूस निवडला तर आपल्या मुलांचं भविष्य धोक्यात येईल. विकास करणाऱ्या माणसाच्या पाठीमागे उभं राहा. हा संघर्ष सत्तेसाठी नाही, तर तुमच्या भवितव्यासाठी आहे.

## भरत शहा यांच्या नगराध्यक्ष पदाच्या विजया साठी लक्ष्मी नरसिंह देवस्थानात साकडे

### इंदापूरच्या विकासासाठी पुन्हा शहा परिवार सज्ज

दैनिक वादळ वार्ता
**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर नगर परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून,शहरातील राजकीय वातावरण तापले आहे.कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन भरत शहा हे नगराध्यक्ष पद लढवणार आहेत.त्यांच्या विजयासाठी आज शनिवार,(ता.१ नोव्हेंबर)रोजी दक्षिण प्रयाग म्हणून प्रसिद्ध असलेल्या निरा-नरसिंहपूर येथील लक्ष्मी नरसिंह देवस्थानात विशेष अभिषेक करण्यात आला.

भरत शहा मित्र परिवाराच्या वतीने आयोजित या धार्मिक कार्यक्रमात शहरातील अनेक नागरिक,व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते आणि समर्थकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.नगराध्यक्ष पदासाठी भरत शहा विक्रमी मतांनी विजयी व्हावेत, यासाठी लक्ष्मी नरसिंह देवतेस साकडे घालण्यात आले.भरत शहा यांच्या कुटुंबातील अंकिता मुकुंद शहा



देशपातळीवर इंदापूर नगर परिषदेचा नावलौकिक झाला आहे.

शहरात नवीन व्यापारी संकुल,अत्याधुनिक नगरपरिषद भवन,शुद्ध पाण्याचा अखंड पुरवठा,शहर कचरामुक्त करण्यासाठीचे उपक्रम, नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना कायम करण्याचे निर्णय तसेच अंतर्गत रस्ते, ड्रेनेज, ऑक्सिजन पार्क व बायोडायव्हर्सिटी प्रकल्पांतर्गत हजारो वृक्षांची जोपासना अशा विविध कामांमुळे शहा परिवाराचे कार्य सर्वदूर चर्चेत आहे.सामाजिक,धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सातत्यपूर्ण आयोजनामुळे शहा परिवाराने इंदापूरच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत भरत शहा यांच्या नगराध्यक्ष पदाला शहरात व्यापक पसंती मिळू लागली आहे.यावेळी कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन भरत शहा,शहा ग्लोबल स्कूलचे विश्वस्त मुकुंद शहा,गणेश महाजन,अंगद शहा,प्रमोद राऊत,सुनील तळेकर,प्रशांत उंबरे,निवास माने,बापूराव जामदार,अजिंक्य जावीर,शुभम पवार,गौरव राऊत,प्रवीण हरणावळ,सोनू सय्यद,महेश पाटील,बापू अडसूळ,गोरख ढावरे,उमेश ढावरे,अभिजीत अवघडे,मनोज राजगुरू,पुंडा काका बानकर,बंडा चव्हाण आदित्य बोराटे,शकील सय्यद,संतोष जाधव,अजिंक्य ढाणे,हर्षद सय्यद,ओंकार मोरे,अत्तर मोमीन,अक्षय सूर्यवंशी यांच्यासह शेकडो युवक यावेळी उपस्थित होते.

### जनतेच्या मनात घर करणाऱ्या समाजसेविका

## सौ.पूजा विजयकुमार बोडके काँग्रेसकडून एकलारा पं स गणातून इच्छुक उमेदवार

दैनिक वादळ वार्ता
**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड तालुक्यातील एकलारा पंचायत समिती गण हा सर्वसाधारण महिला राखीव असल्यामुळे चोंडी नगरीचे युवा उद्योजक विजयकुमार जयसिंग बोडके पा. चोंडीकर यांच्या पत्नी सौ. पूजा विजयकुमार बोडके पा. या एकलारा पंचायत समिती गणातून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवार म्हणून पुढे सरसावल्या आहेत. समाजसेवेच्या माध्यमातून ग्रामीण भागात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या या कार्यकर्त्या आता राजकारणाच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांसाठी लढा देण्यास सज्ज झाल्या आहेत.सौ. पूजा विजयकुमार बोडके या गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत.



चोंडी परिसरातील गोरगरीब, शेतकरी, विधवा, निराधार महिला यांचे प्रश्न त्यांनी सातत्याने प्रशासनापर्यंत पोहोचवले आहेत. जनतेच्या अडचणीत तत्काळ धावून जाणारी सामाजिक कार्यकर्त्या महिला म्हणून त्यांची ओळख समाजात पक्की झाली आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले असून, ग्रामीण महिलांना आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.राजकारणात महिलांचा वाढता सहभाग ही काळाची गरज असल्याचे मत सौ. पूजा विजयकुमार बोडके पाटील व्यक्त केला आहे.राजकारण हे केवळ सत्तेचे नव्हे, तर समाजसेवेचे साधन आहे. लोकांचा विश्वास जिंकणे आणि त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करणे हेच आमचं ध्येय आहे, सौ. पूजा बोडके पाटील या केवळ उमेदवार नाहीत, तर समाजातील प्रत्येक घटकाला जोडणारा विश्वासाचा दुवा आहेत. युवकांना रोजगाराच्या संधी, शेतकऱ्यांना दिलासा, महिलांना सन्मान आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचा त्यांचा निर्धार आहे.काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या इच्छुक उमेदवारीबाबत उत्साहाचे वातावरण असून, सौ. पूजा विजयकुमार बोडके पाटील या त्यांच्या सामाजिक कार्याच्या बळावर, प्रामाणिक प्रतिमेवर आणि महिला वर्गाच्या पाठिंब्याने येणाऱ्या निवडणुकीत काँग्रेसला मजबूत स्थान मिळवून देतील, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच विनायक रामराव पाटील माजी सरपंच चोंडी व राजेसाब शेख चोंडीकर व्हाईस चेअरमन सेवा सह.सोसायटी चोंडी व युवा कार्यकर्ते शंकर देवकते पाटील चोंडीकर एकलारा पंचायत समिती गणातून सौ. पूजा विजयकुमार बोडके पाटील काँग्रेसकडून उमेदवारी मिळाली तर शंभर टक्के निवडून येतील असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे

# बंदुकीच्या धाकावर सराफाचे अपहरण करून लूट
# नंदुरबार आणि धुळ्यातील ५ आरोपींना अटक

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

स्थानिक गुन्हे शाखेने आणि शहादा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत, एका सराफाचे बंदुकीच्या धाकावर अपहरण करून त्याला लुटणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील पाच आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून ४५०० ग्रॅम चांदीचे दागिने आणि ५२,४०० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. दिनांक २७/१०/२०२५ रोजी शहादा येथील सोनारगल्ली, मेन रोडचे रहिवासी असलेले तक्रारदार रितेश पारेख हे सराफ व्यावसायिक आपल्या चारचाकी वाहनाने बुडीगव्हाणहून म्हसावदकडे जात होते. त्याचवेळी, स्विफ्ट डिझायर गाडीतून आलेल्या पाच अज्ञात व्यक्तींनी त्यांचे वाहन अडवले. आरोपींनी सराफाला बंदूक आणि चाकू दाखवून धमकावले. यानंतर, त्यांचे अपहरण करून त्यांना जखमी केले गेले आणि त्यांच्याकडील सोने, चांदी तसेच रोख रक्कम लुटून नेली. या घटनेप्रकरणी शहादा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध भादंवि कलम ३१०(२), ३१०(४) आदी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि शहादा पोलीस ठाण्याकडून या गुन्ह्याचा तपास सुरू होता. तपासामध्ये, उपलब्ध पुरावे आणि गोपनीय माहितीच्या आधारे, हा गुन्हा धुळ्यातील गुन्हेगारांच्या टोळीने स्थानिक सहकार्याने केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी अत्यंत गोपनीय माहिती काढून या गुन्ह्यात सहभागी असलेल्या पाच जणांना अटक केली. कसून चौकशी केली असता, त्यांनी आपला गुन्हा कबूल केला.



### अटक करण्यात आलेले आरोपी

भरत गोविंद वदार (वय ४९), औरंगपूर, ता. शहादा, जि. नंदुरबार. रोहित उर्फ गोल्या संजय मराठे (वय २६), कनाडी, ता. शहादा, जि. नंदुरबार. अक्षय पांडुरंग सोनार (वय ३१), रामेश्वर मंदिर, सोनारगल्ली, शहादा, जि. नंदुरबार. पुरवेश रमेश सोनवणे (वय ३१), नंदुरबार. निलेश नाना पवार (वय ३३), सिद्धेश्वर हॉस्पिटल, गरुड कॉलनी, देवपूर, धुळे. आरोपींकडून लुटीच्या एकूण मुद्देमालापैकी ४५०० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने आणि ५२,४००/– रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अपर पोलीस अधीक्षक अशीत कांबळे, शहादा उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निलेश देसले आणि इतर तपास पथकाने केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

## केज तालुक्यात अल्पवयीन मुलीचे अपहरण अपहरणकर्त्यानेच वडिलांना दिला धक्कादायक कॉल

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील एका गावातून १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, अपहरण केल्यानंतर आरोपी तरुणानेच मुलीच्या पित्याला फोन करून तुमची मुलगी माझ्या ताब्यात आहे, असा सिनेमातील खलनायकासारखा संवाद सांगितला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी आपल्या कुटुंबासोबत शेतातच राहते. तिचे वडील साखर कारखान्यात ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनावर चालक म्हणून काम करतात. शनिवार, दि. १ नोव्हेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास गावातीलच १६ वर्षीय अविवाहित ऊस तोड मजूर तरुणाने तिचे अपहरण केले.




रात्री उशिरापर्यंत मुलगी घरी न परतल्याने तिच्या आईने नातेवाईक व शेजाऱ्यांकडे चौकशी केली, मात्र मुलगी कुठेच सापडली नाही. दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी, दि. २ नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारास मुलीचे वडील मुलीचा शोध घेत असताना, आरोपी तरुणाने त्यांच्या मोबाईलवर कॉल करून तुमची मुलगी माझ्यासोबत आहे, असे सांगितले.मुलीच्या पित्याने माझ्या मुलीला गुपचूप घरी आणून सोड, अशी विनंती केली; परंतु आरोपीने तिचा परतावा न करता तिला आपल्या ताब्यातच ठेवले. अखेर मुलीच्या वडिलांनी केज पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी ऊस तोड मजुराविरुद्ध अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याचा गुन्हा नोंदवला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम करीत आहेत. या घटनेमुळे गावात व परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरु आहे.

## गुरुकृपा योगा अकॅडमी कडून मोफत योगा क्लासेसचे आयोजन

### केज शहरातील महिलांनी लाभ घेण्याचे सुवर्णा शेटे यांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरामध्ये मागील काही महिन्यांपासून कार्यरत असलेल्या गुरुकृपा योगा अकॅडमी कडून महिला,पुरुष व लहान मुलांसाठी एक महिन्याचे मोफत योगा डेमो क्लासेसचे आयोजन करण्यात आले आहे.दि.१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान क्लासचे आयोजन करण्यात आले आहे.पहाटे ५ –१५ ते ६–३० यावेळेत भवानी मंदिर,धारुर रोड,केज येथे व सकाळी ११–०० ते १२–०० यावेळेत आवाड एज्युकेशनल अकॅडमी, कानडी रोड केज येथे या क्लासचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिला–पुरुषांचे विविध शारीरीक समस्या, लहान मुलांमधील स्थूलता याविषयी माहिती देवून योगासने करून घेतली जाणार आहेत.तरी जास्तीत जास्त महिला पुरुषांनी व लहान वयोगटातील मुलांनी या एक महिन्याच्या मोफत क्लासचा लाभ दोन्ही वेळे पैकी आपल्या सोयीच्या वेळे नुसार घ्यावा असे आवाहन संचालिका योगशिक्षिका सुवर्णा शेटे यांनी केले आहे.




## अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य युवक प्रदेशाध्यक्ष पदी रोहन गलांडे पाटील यांची निवड

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील चिंचोली माळी येथील रोहन गलांडे पाटील यांची अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य युवक प्रदेशाध्यक्षपदी, सचिव चंद्रकांत दादा जाधव व कार्याध्यक्ष सतिष पवार पाटील यांच्या शिफारशीनुसार अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ संस्थापक अध्यक्ष शिवश्री प्रल्हाद दादा गुळभिले पाटील यांच्या आदेशानुसार नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली आहे तरी रोहन गलांडे पाटील यांनी कुणबी मराठा महासंघाच्या संस्थापक अध्यक्ष शिवश्री प्रल्हाद दादा गुळभिले यांचे व सर्व वरीष्ठ पदाधिकारी यांचे आभार मानले आहेत, आयुष्यभर ऋणी राहीन असे मत व्यक्त केले आहे. तसेच रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले की संघाने माझी नियुक्ती आजपर्यंत केलेल्या कामाची दखल घेऊन केलेली आहे जसे की मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण तसेच सर्वसामान्य जनतेसाठी अनेक छोटे मोठे आंदोलने विकास कामे केले आहेत त्यांची दखल घेऊन मला अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.त्यामुळे मी यापुढेही असेच सर्वसामान्य जनते साठी सर्व जातिधर्मातील नागरिकांसाठी कायम लढत राहील शेवटच्या श्वासापर्यंत व महाराष्ट्रात अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे संघटीकरण मोठ्या संख्येने करणार आहे असे वचन संस्थापक अध्यक्ष यांना दिले आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.



### आमदार विजयकुमार देशमुख यांचा वाढदिवस व दिवाळी निमित्त

## देशाभिमान मित्रपरीवाराच्या वतीने दिव्यांग बांधवांना कपडे व फराळ वाटप

दैनिक वादळ वार्ता

**सोलापूर । प्रतिनिधी**

आमदार विजयकुमार देशमुख यांचा वाढदिवस व दिवाळी निमित्त देशाभिमान मित्रपरीवाराच्या वतीने दिव्यांग बांधवांना कपडे व फराळ वाटप करण्यात आले शेळगी येथील सिध्दाराम नागशेट्टी व देशाभिमान मित्रपरीवाराकडून सलग दहाव्या वर्षी दिव्यांग , गरीब व वंचित बांधवांना आमदार विजयकुमार देशमुख यांच्या शुभहस्ते कपडे व फराळ वाटप करण्यात आले प्रारंभी ग्रामदैवत सिद्धरामेश्वरांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले याप्रसंगी शेळगीतील समर्थ ज्येष्ठ नागरीक संघटनेचे नूतन अध्यक्ष शिवलिंगप्पा शहाबादे ,उपाध्यक्ष चंद्रकांत अण्णा रमणशेट्टी ,सचिव सुनील पुजारी ,सहसचिव अंबादास बिराजदार ,कोषाध्यक्ष शरणप्पा यारगले,संचालक काशिनाथ मेलगिरी ,मल्लिनाथ कट्टे,अप्पाराव विभुते,मल्लिनाथ बताले ,महादेव पाटील ,विश्वनाथ कल्यानशेट्टी,अशोक खानापुरे,विजयराव काटोलकर,संचालिका कस्तुरी अक्कलकोटे,महानंदा बावी, प्रकाश बिराजदार यांच्यासह सर्व नुतन सभासदांचा सत्कार करण्यात आला तसेच वाढदिवसानिमित्त आमदार विजयकुमार देशमुख यांचाही भव्य सत्कार करण्यात आला यावेळी ❋सोलापूर शहर उत्तर चे लोकप्रिय आमदार मा. श्री. विजयकुमार देशमुख (मालक) यांच्या वाढदिवसानिमित्त देशाभिमानचे संस्थापक सिध्दाराम नागशेट्टी मित्र परिवार तर्फे दिव्यांग बांधवांना व गरजु नागरिकांना दिवाळी फराळ साडी व कपडे ५०० किट चे वाटप करण्यात आले ५५१ व्यक्तीनी रक्तदान केले.सर्वांना टी.शर्ट ,बॅग वाटप केले. माजी सभागृह नेता संजय कोळी माजी नगरसेवक डॉ किरण देशमुख मालक माजी नगरसेवक चंद्रकांत आण्णा रमणशेट्टी प्रकाश नाना बिराजदार माजी नगरसेवक शिवशंकर कंटीकर प्रकाश बिराजदार साहेब सायबर गुन्हे शाखेचे अधिकारी मच्छिंद्र राठोड साहेब संजय कणके गुरुनाथ वांगीकर शिवलिंग शाहबादे युवा नेते सुशिल सरवदे बसवराज इटकळे राजशेखर रोडगीकर अशोक खानापुरे सुनिल पुजारी डॉ राजीव मठ मल्लिकार्जुन कट्टे अंबादास बिराजदार विजयकुमार कुलकर्णी विजयकुमार बिराजदार शरणप्पा यारगले जयश्री ताई धप्पाधुळे प्रकाश जाधव बताले काका बाबुराव नरोणे परमेश्वर रमणशेट्टी गुरुनाथ होसाळे गंगाधर झुरळे सिध्दाराम यलशेट्टी शिवराज धप्पाधुळे उपस्थित होते .यावेळी आमदार विजयकुमार देशमुख यांनी सिध्दाराम नागशेट्टी यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून दिव्यांग व वंचितांची दिवाळी गोड करून त्यांच्या आनंद आणल्यामुळे सामाजिक बांधिलकी जपण्याचे महत्वपूर्ण कार्य करत असल्याचे प्रतिपादन केले .

## डॉ.संपदा मुंडे यांच्या प्रकरणी परळीत उद्या जन आक्रोश मोर्चाचे आयोजन

### श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे–दिपक देशमुख

दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणी राज्यभर संतापाची लाट आहे. तपास योग्य पद्धतीने व्हावा यासाठी परळीकरांच्या वतीने जन आक्रोश मोर्चा बुधवार दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता होत आहे.राणी लक्ष्मीबाई टॉवर पासून ह्या मोर्चाला सुरुवात होत असून मोंढा मार्केट, एकमीनार चौक मार्गे रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापाशी श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे.उद्या होत असलेल्या या मोर्चाद्वारे डॉ. संपदा मुंडे यांचे प्रकरण बीड येथे वर्ग करून फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे, सर्व संशयितांची सखोल चौकशी करण्यात यावी,



संपादा मुंडे यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रारीच्या संबंधातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची सखोल चौकशी करीता एक चौकशी समिती स्थापन करण्यात यावी यासह विविध मागण्या घेऊन परळीकर या मोर्चात सहभागी होणार आहेत.डॉ. संपदा मुंडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी प्रत्येकाने उपस्थित राहावे असे आवाहन परळीचे माजी नगराध्यक्ष दिपक नाना देशमुख यांनी केले आहे.

## कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात शॉर्टसर्किटमुळे आग

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी । मोलगी**

धडगाव, ता. २ नोव्हेंबर दुपारी सुमारे एक वाजेच्या सुमारास समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद नंदुरबार अंतर्गत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, सुरवाणी (ता. धडगाव) येथे विजेच्या कमी–जास्त प्रवाहामुळे शॉर्टसर्किट होऊन शाळेच्या कार्यालयात अचानक आग लागली.

घटनेची माहिती मिळताच मुख्याध्यापिका श्रीमती पल्लवी जाधव यांनी तात्काळ धडगाव नगरपंचायतीच्या अग्निशमन विभागाशी संपर्क साधला. अग्निशमन कर्मचारी सेगा पावरा व गोपाळ पावरा यांनी तत्परतेने घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.



या आगीत शाळेतील कार्यालयीन साहित्य, टेबल, खुर्च्या, सीसीटीव्ही यंत्रणा, कॉम्प्युटर, पंखे तसेच शालेय अभिलेखे पूर्णतः जळून खाक झाले. सुमारे दीड तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आली. उद्या दिनांक ३ सोमवारपासून शाळा सुरू होणार असताना सुटीच्या दिवशी ही घटना घडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र कार्यालयीन साहित्य आणि अभिलेख या आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077